आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

गेल्या ११ वर्षात वाढलेल्या दळणवळण आणि पायाभूत सुविधांमुळे नागरिकांच्या राहणीमानात सुधारणा झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

रायगडमध्ये दिघी आणि छत्रपती संभाजीनगर जवळच्या ऑरिक औद्योगिक वसाहतीत इटालियन कंपन्यांसाठी विशेष सुविधा निर्माण होणार

लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या सात जणांच्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक

**आणि**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना थोड्याच वेळात ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रंगणार

**<><><><><>**

अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्याने प्रेरित आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पायाभूत सुविधांमधल्या क्रांतीची अकरा वर्षे असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात नमूद केलं आहे. रेल्वे, महामार्ग, बंदरे, विमानतळ यासारख्या दळणवळण आणि पायाभूत सुविधांमुळे राहणीमानातील सुविधा तसंच समृद्धीत वाढ झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या वैशिष्ट्यांमुळे आत्मनिर्भर भारताचा पाया घातला गेल्यांचं या संदेशात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

गेल्या अकरा वर्षांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकारने केलेल्या क्रांतीमुळे भारताचं नवनिर्माण झालं आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नवनवीन अत्याधुनिक पायाभूत सुविधांमुळे देशाची एकात्मता आणि

मजबूती यात भर पडल्याचं शहा यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. या सुविधांमुळे व्यापार आणि आर्थिक व्यवहार पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक वेगवान झाले आहेत असं शाह यांनी नमूद केलं आहे.

<><><><><>

सेवा, सुशासन आणि गरिबांचं कल्याण या तत्त्वांनी प्रेरित होऊन भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. यात वाहतुकीशी संबंधित पायाभूत सुविधांमधल्या परिवर्तनाचाही मोठा समावेश आहे. रालोआ सरकारच्या काळात गेल्या दहा वर्षात महामार्ग बांधण्याचं प्रमाण सरासरी ३४ किलोमीटर प्रतिदिन इतकं वाढलं असून ते २०१४च्या प्रमाणाच्या तिप्पट आहे. भारतमाला योजनेंतर्गत आर्थिक कॉरिडोर विकसित करण्यासाठी २० हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे महामार्ग बांधण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाशी संपर्क जवळपास ९९ टक्के इतका वाढला आहे. २०१४पासून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ७ लाख ८० हजार किलोमीटरहून अधिक रस्ते बांधण्यात आले आहेत. पीएम गतिशक्ती योजनेद्वारे पायाभूत सुविधांच्या एकत्रित विकासासाठी ४४ मंत्रालयं आणि ३६ राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांना जीआयएस आधारित डिजिटल माध्यमातून जोडण्यात आलं आहे. ४५ हजार किलोमीटरहून अधिक मार्गांचं विद्युतीकरण, ३३३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ६८ वंदे भारत रेल्वे गाड्या, अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत १ हजार ३०० हून अधिक रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण अशी अनेक विकासकामं गेल्या दशकभरात करण्यात आली आहेत. मेट्रो रेल्वेचं जाळं आता २३ शहरांमध्ये विस्तारलं आहे. सागरमाला योजनेच्या माध्यमातून बंदरांशी संबंधित २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उडान योजनेमुळे विमान वाहतूक क्षेत्रात ८८ विमानतळं सक्रिय झाली आहेत. स्टॅच्यू ऑफ युनिटी, चिनाब रेल्वे पूल हे भारताच्या अभियांत्रिकी चमत्कारांचे प्रतीक म्हणून आज उभे आहेत.

<><><><><>

भारत सरकार इटालियन कंपन्यांसाठी “होम अवे फ्रॉम होम” या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी इटली दौऱ्यादरम्यान ही माहिती दिली. राज्यात या वसाहतींसाठी रायगडमधलं दिघी आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटीचा विस्तार सुमारे आठ हजार एकरांपर्यंत करण्याचा प्रस्ताव सरकारने तयार केला असून, या विस्तारीकरणात इटालियन कंपन्यांसाठी स्वतंत्र क्लस्टरची रचना केली जाणार आहे. या वसाहतीत इटालियन कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा दिल्या जाणार असून, यामध्ये इटालियन अभ्यासक्रमावर आधारित शाळा तसंच महाविद्यालयं, इटलीतील आरोग्य विमा योजनांना स्वीकारणारी हॉस्पिटल्स, तसंच एकत्रितपणे काम आणि निवास आदी सुविधांचा समावेश असेल. इथे होणाऱ्या गुंतवणुकीमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील तसंच पायाभूत सुविधा अधिक विकसित होतील, असा विश्वास वर्तवला जात आहे.

**<><><><>**

सोलापूर जिल्ह्यातल्या करमाळा मतदारसंघाचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबई इथं त्यांचा प्रवेश झाला. जगताप हे १९९० आणि २००४ अशा दोन वेळा विधानसभेवर निवडन आले होते. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्ष प्रवेश महत्त्वाचा  मानला जात आहे.

**<><><><>**

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, दिव्यांगांना सहा हजार मानधन अशा मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलनाला बसलेल्या माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांची प्रकृती खालावली आहे. कडू यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. अमरावतीचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांनी बच्चू कडू यांची भेट

घेत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीनंतर कडू यांनी रक्तदाबाची गोळी घ्यायला सुरुवात केली आहे. मात्र, आपल्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

त्यांच्या समर्थनार्थ प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आज मंत्रालयाबाहेर आंदोलन केलं.

<><><><><>

लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या सात जणांच्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातल्या कारखेल बुद्रुक गावात एका तरुणाचं लग्न जुळवण्यासाठी काही लोकांनी पावणे सहा लाख रुपये घेतले होते. मात्र नवरी मुलगी लग्नानंतर तरुणाकडे राहायला येत नाही हे पाहून आपली फसवणूक झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. वडवणी इथल्या एका ऊसतोड कामगार तरुणाकडूनही या टोळीने लग्न जुळवण्यासाठी तीन लाख रुपये घेतले. मात्र नवरी मुलगी लग्नानंतर दोनच दिवसात पळून गेली. या प्रकरणी तपास केला असता फसवणूक करणारी टोळी पोलिसांच्या हाती लागली. नागरिकांनी खात्री झाल्यानंतरच लग्न करावं असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव शहरात उशिरानं दिलेल्या जन्म दाखल्यांमधले तब्बल १ हजार ४४ दाखले बनावट असल्याचं उघड झालं आहे. याप्रकरणी महानगरपालिकेच्या प्रभारी आरोग्याधिकारी जयश्री आहेर यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध किल्ला पोलिसांत तक्रार दिली आहे.

<><><><><>

आरमोरी तालुक्यातल्या देऊळगाव आणि डोंगरसावंगी या दोन रेती घाटांमधून अवैध रेतीउपसा होत असताना पोलिसांनी काल मध्यरात्री छापा घालून

सुमारे १ कोटी ४५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हे दाखल केले असून, त्यापैकी चार जणांना अटक केली आहे.

**<><><><>**

विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत कृषी विज्ञान केंद्र परभणी आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने परभणी जिल्ह्यामध्ये पूर्णा तालुक्यात आव्हाई इथे शेतकरी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर पिकणाऱ्या नगदी पिकांविषयी शास्त्रज्ञांनी संपूर्ण मार्गदर्शन केलं. या कार्यक्रमाविषयी परभणीचे शेतकरी जळबाजी बुचाले यांनी अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - जळबाजी बुचाले**

**<><><><>**

विकसीत कृषि संकल्प यात्रा अंतर्गत केंद्र सरकारच्या कृषी आणि किसान कल्याण मंत्रालय, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, कृषी विज्ञान केंद्र, सांगली, कृषी विभाग सांगली तसंच आत्मा प्रकल्प सांगली यांच्या संयुक्त प्रयत्नातून आयोजित “कृषी संकल्प अभियान” हा महत्वाकांक्षी कार्यक्रम मिरज तालुक्यातल्या शिपूर इथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला शिपूर गावातले प्रगतशील शेतकरी, शेतकरी गट, महिला शेतकरी यांची मोठी उपस्थिती होती.

**<><><><>**

चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर ६ पूर्णांक ३ दशांश टक्के राहिल असा अंदाज जागतिक बँकेनं वर्तवला आहे. जगातली सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असण्याचा मान भारत या आर्थिक वर्षातही कायम ठेवेल, असं जागतिक बँकेनं म्हटलंय. गेल्या आर्थिक वर्षात औद्योगिक विकास दर कमी झाल्यानं देशाच्या आर्थिक वृद्धी दरात अपेक्षित वाढ झाली नाही. पण बांधकाम आणि सेवा क्षेत्राच्या विकासात वाढ झाली. ग्रामीण भागात मागणी वाढल्यानं कृषी

क्षेत्राच्या वृद्धी दरात वाढ झाल्याचं जागतिक बँकेच्या ग्लोबल इकॉनॉमिक प्रॉस्पेक्ट्स रिपोर्ट अहवालात नमूद केलं.

**<><><><><>**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना आज दुपारी साडे ३ वाजता ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरू होणार आहे. गेल्यावेळी अंतिम सामन्यात भारताला नमवून ऑस्ट्रेलियानं ही स्पर्धा जिंकली होती. दक्षिण आफ्रिका पहिल्यांदाच अंतिम सामन्यात पोहोचली आहे.

//<><><><><>//